## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- ११८३/२०२३

**अपिलार्थी, श्री.सुदेश रोहरा**
३०१, गायत्री अपार्टमेंट, देवनी भवानी मंदिर,
नेहरु चौक, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००२.

विरुध्द

जन माहिती अधिकारी, जन्म मृत्यू नोंदणी विभाग,
उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत,
चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त् (आरोग्य)
उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत,
चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १६.०६.२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०६.१२.२०२२ | --- | ३१.०१.२०२३ | -- |

अपिलार्थी यांनी दि. २१.०४.२०२३ रोजीच्या अर्जान्वये *"PIO not providing information and FAA not passing order of first appeal."* असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १६.०६.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी ऑनलाईन उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.विजय खेडकर, उप आयुकत, वैद्यकीय आरोग्य विभाग, उल्हासनगर महानगरपालिका उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी डॉ.मोहीनी धर्मा, निबंधक जन्म मृत्यु नोंदणी विभाग, उल्हासनगर महानगरपालिका ऑनलाईन उपस्थित आहे.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*"Information required under RTI act, २००५ regarding issue of birth certificate.*

*१) Please provide the certified copy of rule ९ of Maharastra Registration of Birth Rule १९७६.*

*२) Please provide the certified copy of section १२/१७ of R.b.D.Act १९६९.*

*३) Please provide certified copy of inward registered in which applications for issue of birth certificate isentered.*

*४) Please provide the name of documents re uired for issue of Birth Certificate.*

*५) Please provide the name of documents received in each & every application received.*

*६) Provide the date of issue of each & every birth certificate issued.*

*७) Please provide the total number of birth certificate issued after receipt of application within (i) २१ days (ii) after २१ days but before ९० days (iii) after ९० days but before six months (vi) after six months but before One year (vii) after one year but before two year (viii) Pending till today."*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन कले की, त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही. जी माहिती प्राप्त झालेली आहे ती अपूर्ण व त्रोटक स्वरुपाची आहे.

आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी डॉ.मोहीनी धर्मा, निबंधक जन्म मृत्यु नोंदणी विभाग, उल्हासनगर महानगरपालिका ऑनलाईन उपस्थित आहेत. तथापि त्यांचेकडे कोणतीही माहिती नाही. त्यांनी सुनावणी दरम्यान असे

सांगितले की, त्या रजेवर आहेत व म्हणून त्या त्यांचे निवासस्थानावरुन सुनावणीसाठी ऑनलाईन उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी या कोणत्याही माहितीच्या अभावी सुनावणीस उपस्थित राहत असल्याने, याप्रकरणात कोणतेही आदेश होऊ शकत नाही. सबब सदर प्रकरणावर पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण कागदपत्रांसह स्वत: उपस्थित राहणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१४.०७.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ जून, २०२५.